# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

# भिवापूर महाविद्यालय, भिवापूर, जि. नागपूर.

वर्ग :- एम. ए. (राज्यशास्त्र)

प्रथम वर्ष (प्रथम सत्र)

संशोधनकर्ता :- कुमारी. पल्लवी गोकुळ भोयर

मार्गदर्शक :- डॉ. मंगेश वसंतराव कडू
(भिवापूर महाविद्यालय, भिवापूर)

## सत्र :- २०२२ - २०२३

Principal
Bhiwapur Mahavidyalaya,
Bhiwapur

# राजकीय सिद्धांताची ओळख
## (An Introduction Political Theory)

**उद्दिष्टे :-**

राज्यशास्त्रामध्ये राजकीय सिद्धांताला महत्त्वाचे स्थान आहे. कारण कोणताही विषय समजून घेताना त्या संबंधीचे सिद्धांत अभ्यासणे आवश्यक असते. म्हणून राजकीय सिद्धांताचे स्वरूप व्याप्ती व महत्त्व अभ्यासणे गरजेचे आहे. राजकीय सिद्धांतामध्ये विचार प्रणालीची भूमिका, अभिजात राजकीय सिद्धांताची प्रस्तुतता आणि राजकीय सिद्धांताला ऱ्हास व पुनर्जीवन इत्यादी घटकाचा अभ्यास करणे आवश्यक आहे. जगातील अनेक घडामोडी अनेक प्रश्न व राज्यशास्त्रातील वेगवेगळ्या प्रवाहाच्या संदर्भात राजकीय सिद्धांत निर्माण झालेले असतात. याद्वारे समाजातील

ज्या समस्या निर्माण झाल्या आहेत त्या राजकीय सिद्धांताद्वारे निराकरण हे महत्त्वाचे उद्दिष्टे आहे.

<u>प्रस्ताविक</u> :-

राज्यशास्त्र हे प्राचीन काळापासून सामाजिक-शास्त्राचा भाग मानण्यात आले आहे. जेव्हा मनुष्यप्राणी संघटित समाजात राहू लागले तेव्हापासून या शास्त्राचे अस्तित्व दिसून येते. सामाजिक व्यवहाराचे नियम व नियंत्रण समाजातील व्यक्तींचे जीवित सुरक्षितता आणि सामाजिक जीवनातील संघर्ष निवारण इत्यादी प्रश्न संघटित समाजात निर्माण झाले. यातूनच राज्याची निर्मिती झाली राज्यनिर्मिती व त्याच्या कार्यासंबंधी गोष्टींचा अभ्यास राजकीय सिद्धांतात

केला जातो. थोडक्यात राज्यसंस्थेची ध्येये मूल्ये आणि कार्यपद्धती याबद्दल राज्यसंस्थेचे स्वरूप काय असावे यासंबंधी जे निरनिराळे विचारप्रवाह निर्माण झाले त्यांना राजकीय सिद्धांत म्हणून ओळखले जाते. राजकीय सिद्धांतामध्ये ग्रीक तत्त्ववेत्त्यांनी महत्त्वाचे योगदान दिले आहे. ॲरिस्टॉटलने आपल्या ग्रंथाचे नाव पॉलिटिक्स असे दिले. तेव्हापासून त्याला राज्यकारभाराचे शास्त्र असा अर्थ प्राप्त झाला. ॲरिस्टॉटलने राज्यशास्त्राला शास्त्रांचे शास्त्र असे म्हटले. परंतु त्या काळामध्ये राज्य आणि समाज यांच्यात भेद केला जात नसे, त्यामुळे राज्यशास्त्राचे स्वरूप सर्वसमावेशक होते.

आधुनिक काळामध्ये राजकीय सिद्धांत

त्याचे स्वरूप, व्याप्ती आणि मध्यकालीन परिस्थितीमध्ये त्याचे महत्त्व स्पष्ट करणे गरजेचे आहे. तसेच राजकीय सिद्धांतामध्ये विचारप्रणालीची भूमिका महत्त्वाची आहे कारण जगामध्ये अनेक विचारप्रणाली निर्माण झाल्या असून त्याचे प्रतिबिंब राजकीय सिद्धांतामध्ये पडल्याचे दिसून येते. तसेच राजकीय सिद्धांतामध्ये अभिजात राजकीय सिद्धांत व त्याची मध्यकालीन प्रस्तुतता याचा अभ्यास करणे क्रमप्राप्त आहे. 20 व्या शतकामध्ये राजकीय सिद्धांत मृत पावले आहे. अशी घोषणा अनेक विचारवंतानी केली. त्यानंतर जगामध्ये अनेक घटना घडल्यामुळे असे सांगण्यात आले की आता राजकीय सिद्धांत हे मृत पावले नसून त्याचे पुनरुज्जीवन झाले आहे.

अशाप्रकारे प्रस्तुत प्रकरणामध्ये राजकीय सिद्धांताचे स्वरूप व्याप्ती आणि महत्त्व राजकीय सिद्धांतातील विचारप्रणालीची प्रस्तुतता अभिजात राजकीय सिद्धांताची प्रस्तुतता आणि राजकीय सिद्धांताचा ऱ्हास व पुनरुज्जीवन इत्यादी घटकांचा अभ्यास करणार आहे.

## विषय विवेचन :-

राजकीय सिद्धांत हे राज्यशास्त्र किंवा राजकारणासंबंधी संकल्पना नसून ते राज्यशास्त्राचे विज्ञान आणि राजकारणाचे तत्त्वज्ञान ही आहे. राजकीय सिद्धांत ही कोणती विचारधारणा नाही यामध्ये संकल्पना विज्ञान तत्त्वज्ञान आणि विचारधारेचे मूळ सिद्धांत आहे. राजकीय सिद्धांतात विभिन्न विचारवंतांनी आगमन पद्धती निगमन पद्धती विश्लेषणात्मक पद्धती संश्लेषणात्मक पद्धतीचा वापर करून व्यवस्थितरित्या सिद्धांताची मांडणी केली आहे. त्यासंबंधी पुढीलप्रमाणे अभ्यास करणे

आवश्यक आहे.

राजकीय सिद्धांत : स्वरूप, व्याप्ती व महत्त्व

## राजकीय सिद्धांताचा अर्थ :-

थिअरी हा शब्द थिआ (Theo) या शब्दापासून निर्माण झालेला आहे. दृष्टी किंवा दृश्य पाहणे होय. म्हणजेच पाहून घेण्याची दृष्टी असा अर्थ होतो. सिद्धांत म्हणजे घटनांचा परस्परसंबंध आणि वास्तवता पाहून घेणारा दृष्टिकोन होय. सुसंघटीत ज्ञानाच्या आधारे संशोधन करून निष्कर्ष काढले जातात. माहितीचे संकलन आणि विश्लेषण जेवढे अचूक असेल तेवढ्या प्रमाणात निष्कर्षाचा दर्जा ठरून तो सिद्धांत वास्तववादी व प्रभावी ठरतो. अर्थात मानवाने आपल्या समृद्ध जीवनाचे व संघटनेचे प्रश्न जाणीवपूर्वक समजावून घेण्याचा व सोडविण्याचा केलेला प्रयत्न म्हणजे

राजकीय सिद्धांत होय. राजकीय सिद्धांतामध्ये तत्वज्ञान, विचारप्रणाली व विज्ञान यांच्या मुलतत्वांच्या आधारे बौद्धिक मांडणी केलेली असते. कालानुसार आणि परिस्थितीनुसार राजकीय सिद्धांतावर त्या काळातील संस्कृतीचा प्रभाव पडलेला आहे. राजकीय सिद्धांताच्या अनेक विचारवंतांनी व्याख्या केल्या आहे.

अँड्र्यु हैकर यांच्या मते ज्या तत्वज्ञानात्मक आणि शास्त्रीय ज्ञानाच्या संकल्पनामुळे मग ते केव्हाही आणि कोठेही केलेले असो आम्ही राहत असलेल्या वर्तमानकालीन आणि भविष्यकालीन जगाविषयीची आमची समजुत वाढते त्यास राजकीय सिद्धांत असे म्हणतात

सेबाईन यांच्या मते :- राजकीय सिद्धांत ही एक बौद्धिक परंपरा आहे आणि तिच्या इतिहासात मानवाने काळाच्या ओघात

राजकीय प्रश्नावर जे विचार मांडले त्या प्रश्नाची शिस्तबद्ध मांडणी करणे म्हणजे राजकीय सिद्धांत होय.

डान्टे जर्मिनीच्या मते :- मानवाच्या सामाजिक प्रगतीसाठी आवश्यक असणाऱ्या योग्य अशा व्यवस्थेच्या तत्त्वांचा चिकित्सात्मक अभ्यास म्हणजे राजकीय सिद्धान्त होय.

हॅकर डब्ल्यू कोकरच्यामते :- मानवाच्या कायमस्वरूपी गरजा अपेक्षा आणि मते या दृष्टीकोनातून राजकीय शासनसंस्था व त्याच्या विभागांचे कार्य याचे मूल्यांकन केले जाते तेव्हा त्या अभ्यासास राजकीय सिद्धांताचे स्वरूप प्राप्त होते.

वरील सर्व व्याख्यांवरून असे दिसून येते की राजकीय सिद्धांत मुख्यत:

मानवी जीवनातील समस्या सोडवणे मानव हिताच्या दृष्टिकोनातुन राज्यसंस्थेचा अभ्यास करणे त्याचबरोबर राजकीय व्यवस्थेतील प्रश्नांची व्यवस्थीत मांडणी करणे म्हणजे राजकीय सिद्धांत होय. समाजातील जे प्रश्न आहेत किंवा समाजातील निर्माण होणारे संभाव्य प्रश्न आहेत. त्यांचे निराकरण करण्यासाठी साधकबाधक दृष्टीकोनातुन चर्चा करणे हे काम राजकीय सिद्धांत करते. म्हणुनच असे म्हणता येईल की राजकीय विषयावरील सर्वसाधारण तत्वज्ञानात्मक चिंतन की ज्यामध्ये तत्वज्ञान विचारप्रणाली व विज्ञान यांच्या मुलतत्वाद्वारे मांडणी केली जाते. त्याला राजकीय सिद्धांत असे म्हणतात.

राजकीय सिद्धांताची वैशिष्ट्ये

राजकीय सिद्धांताची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील.

1) राजकीय सिद्धांत हे मुलत: व्यक्तीच्या बौद्धिक व राजकीय क्षमतेवर आधारलेले आहे किंवा मुद्दे संकल्पना स्पष्ट केल्या आहेत यातूनच राजकीय वास्तव स्पष्ट केले आहे. किंवा काही मुद्दे त्यामध्ये प्रामुख्याने प्लेटोच्या रिपब्लिक ॲरिस्टॉटल याचे पॉलिटिक्स किंवा रॉल्स याची ए थेअरी ऑफ जस्टिस इत्यादी ग्रंथातून राजकीय सिद्धांताची निर्मिती झाल्याची दिसून येते.

2) राजकीय सिद्धांतामध्ये व्यक्ती समाज आणि इतिहासाचा समावेश होतो. कारण एखादा समाज कसे संघटित होऊन काम करतो त्याचे प्रमुख लक्ष कोणते आहे. समाजातील प्रश्न कसे सोडवता येतील या सर्व

गोखलेंच्या विचार राजकीय सिद्धांत करीत असतो.

3. राजकीय सिद्धांत हे एका विशेष विषयावर आधारित आहे. कारण विचारवंताच्या उद्देश्य केवळ राज्याच्या स्वरूप संबंधी विचार व्यक्त करीत असतो. परंतु ती व्यक्ती तत्त्वज्ञ, इतिहासकार अर्थतज्ञ धर्मशास्त्रज्ञ किंवा समाजशास्त्रज्ञ असे कोणीही असू शकते.

(4) राजकीय सिद्धांताच्या उद्देश्य केवळ राजकीय वास्तवता समजून घेणे एवढेच नाही तर समाज परिवर्तन करण्यासाठी साधने प्रस्तुत करणे आणि ऐतिहासिक प्रक्रिया संचालित करणे हा आहे.

() राजकीय सिद्धांतामध्ये विचारधारणाही समाविष्ट

असते. ही विचारधारा विशिष्ट मूल्ये आणि विचारांच्या आधारावर निर्माण झालेली असते. राजकीय विचारधारांच्या माध्यमातून राजकीय मूल्ये संस्था व व्यवहाराची माहिती कळते.

(6) राजकीय सिद्धांतातील निष्कर्ष हे तत्व आणि व्यवहार यात समन्वय साधून काढलेले असतील तर ते सामाजिक व राजकीय परिस्थितीशी अधिक जुळणारे व सुसंगत ठरतात.

अशा प्रकारे सिद्धांताची वैशिष्ट्ये स्पष्ट करता येतील.

## राजकीय सिद्धांताचे प्रकार

राजकीय सिद्धांताचे दोन प्रकार पडतात. एक आदर्शवादी राजकीय सिद्धांत आणि दोन अनुभववादी राजकीय सिद्धांत.

आदर्शवादी राजकीय सिद्धांत

आदर्शवादी राजकीय सिद्धांतामध्ये प्रामाणिक आदर्श कमी करून त्यांच्या प्रत्यक्षीकरणासाठी राज्याचे स्वरूप कसे असावे या संबंधीचा अभ्यास केला जातो. आदर्शवादी राजकीय सिद्धांत मुल्याधिष्ठीत असून तो नैतिक दृष्टिकोनावर भर देतो. त्यामध्ये प्रामुख्याने तत्वज्ञानाला महत्व दिले जाते. त्याचबरोबर तो राजकीय सामाजिक आदर्शावर भर देतात आदर्शवादी राजकीय विचारप्रवाहामध्ये प्लेटो ऑगस्टीन हेगेल कान्ट इत्यादी अनेक विचारवंताच्या समावेश होतो. आदर्शवादी राजकीय विचार प्रामुख्याने काय आहे यापेक्षा काय असावे यावरच जास्त भर देतो. त्याचबरोबर अनुभवाच्या आधारे विश्लेषण करण्यापेक्षा तत्वनिष्ठ मुल्यमापनावर भर देऊन

अशी विचारवंतांनी राजकीय सिद्धांताबद्दल मांडलेली मते अनुक्रमाने हे क्रमप्राप्त असते.

ऑक्शु हॅकच्या मते राजकीय तत्त्वज्ञान व राजकीय विचारप्रणाली यांना राजकीय सिद्धांतात महत्त्वाचे स्थान आहे. व्यापक अर्थाने विचार केला तर असे म्हणता येईल की राजकीय विषयावरील सर्वधारणात्मक तत्त्वज्ञान, चिंतन आणि ज्ञान तत्त्वज्ञान आहे असे. तसेच विचारप्रणाली व विज्ञान यांच्या मूलतत्त्वाच्या आधारे बौद्धिक मांडणी केलेली असते. असे प्रतिपादन यांच्या मतप्रमाणे राजकीय सिद्धांतात करता येईल त्याआधारे मानवी समाजजीवनाचे व्यावहारिक प्रश्न समजावून घेणे आणि सोडवणे सहज शक्य होते. हॅकच्या मते राजकीय

समाज जीवनातील विविध राजकीय समस्या सोडविण्याचे काम आदर्शवादी राजकीय सिद्धांतात केले जाते. त्यामुळे वास्तविक मानवी जीवनात आणि मानवी व्यवहारात मूल्ये व आदर्श यांच्या संदर्भ घेतल्याशिवाय आपले संशोधन पूर्ण करता येणार नाही. त्यामुळे मूल्ये समाजासाठी उपयुक्त आहेत. परंतु अनुभववादी विचारवंत मूल्यनिरपेक्षतेचा आग्रह करीत असल्यामुळे आदर्श मूल्यांना नाकारले जाते. परंतु डेव्हिड ईस्टनने राजकीय मूल्ये व नैतिकता व सिद्धांत यांची संशोधनात गरज असल्याचे मान्य केले आहे.

राजकीय सिद्धांताचे स्वरूप

राजकीय सिद्धांताचे स्वरूप स्पष्ट होण्यासाठी

संकल्पना आणि राजकीय सिद्धांत यामध्ये फरक असतो. राज्य सार्वभौम सत्ता, अधिसत्ता, स्वातंत्र्य, समता, न्याय इत्यादी राजकीय संकल्पनाचे स्पष्टीकरण करण्याचे कार्य राजकीय सिद्धांत करित असतात. संकल्पनांना प्रत्यक्षात आणण्यासाठी राजकीय सिद्धांताचे मार्गदर्शन उपयुक्त ठरते.

सेबाईन यांनी ऐतिहासिक दृष्टीकोनातून राजकीय सिद्धांताचे स्पष्टीकरण केले आहे. सेबाईनच्या मते, राजकीय सिद्धांत म्हणजे माणसाने आपल्या समूह जीवनाचे व संघटनेचे प्रश्न जाणीवपूर्वक समजावून घेण्याचा व सोडवण्याचा केलेला प्रयत्न होय. याचा अर्थ असा की राजकीय सिद्धांत ही एक बौद्धिक परंपरा आहे आणि तिचा

इतिहासात माणसाने आपल्या मोठ्या राजकीय प्रश्नावर जे विचार सिद्धांतावर स्पष्ट असलेली असते. विज्ञानविद्या इत्यादींनी होत जाणाऱ्या संस्कृतीचा राजकीय सिद्धांत हा एक अविभाज्य भाग असतो सेबाईनच्या मते, राजकीय सिद्धांत म्हणजे राजकारणाविषयी किंवा राजकारणाशी प्रस्तुत असलेले सगळेच चिंतन होय.

सेबाईन हे ऐतिहासिक दृष्टिकोनाला महत्त्व देतात. कोणताही राजकीय सिद्धांत हा इतिहासातील विशिष्ट टप्प्यावरच्या विशिष्ट स्थळकाळ परिस्थितीचे संदर्भ मनात ठेवून समजून ते केले जाऊ शकते. मात्र हे सिद्धांत भूतकाळातील विशिष्ट घटनेतून निर्माण झाले म्हणून ते भविष्यकाळाच्या दृष्टीने असत्य आहे. असे म्हणता येणार

नाही. राजकीय सिद्धांताची निर्मिती एखाद्या विशिष्ट प्रसंगात किंवा परिस्थितीतून झाली असली तरी त्याचे महत्त्व मात्र त्रिकालबाधित असते. ते नेहमीच उपयुक्त व मार्गदर्शक ठरते त्यामुळे सेबाइनच्या मते, राजकीय सिद्धांताचे हे सार्वत्रिक व त्रिकालबाधित स्वरूप त्याला भविष्यकाळातील परिवर्तनाच्या शक्यता आजमावणी ही क्षमता असते. त्यामुळे सेबाइनने कोणत्याही राजकीय सिद्धांतात खालील तीन गोष्टी ठळकपणे आढळतात असे सांगितले आहे.

(1) ज्या घडामोडींनी तो सिद्धांत जन्मास घातला त्याची वस्तुनिष्ठ मांडणी

(2) स्थूलमानाने ज्यास कार्यकारण संबंध म्हणता येईल त्याचे विवरण

(3) अमुक एक गोष्ट घडावी किंवा योग्य होईल

असे व स्पष्ट असे मुल्यात्मक प्रतिपादन.

अशाप्रकारे कोणतेही राजकीय सिद्धांत असो त्यामध्ये वस्तुनिष्ठता कार्यकारणसंबंध आणि मुल्य-मापनात्मक प्रतिपादन या गोष्टींचा समावेश असतो. असे सेबाइन यांचे मत आहे.

राजकीय सिद्धांताचे स्वरुप समजण्याच्या काळात तत्त्वज्ञानात्मक हेतू पूर्वीच्याकाळी तसेच आणि मुळे ध्यान करुन केला जातो त्यामुळे राजकीय सिद्धांत आणि राजकीय तत्त्वज्ञान यामध्ये फरक मानला जात नव्हता. ॲरिस्टॉटलने राजकीय सिद्धांत व राजकीय कृती यामध्ये फरक केला आहे. परंतु राजकीय सिद्धांताची मांडणी आपल्या दृष्टिकोनातून केली यामुळे विशिष्ट परिणाम कडे जाण्याची त्यांची पद्धत शास्त्रीय नव्हती

नाही. राजकीय सिद्धांताची निर्मिती एखाद्या विशिष्ट प्रसंगात किंवा परिस्थितीतून झाली असली तरी त्याचे महत्त्व मात्र त्रिकालाबाधित असते. ते नेहमीच उपयुक्त व मार्गदर्शक ठरते त्यामुळे सेबाइनच्या मते, राजकीय सिद्धांताचे हे सार्वत्रिक व त्रिकालाबाधित स्वरूप त्याला भविष्यकाळातील परिवर्तनाच्या शक्यता आजमावणे हे शक्य असते. त्यामुळे सेबाइनने कोणत्याही राजकीय सिद्धांतात खालील तीन गोष्टी ठळकपणे आढळतात असे सांगितले आहे.

(1) ज्या घडामोडींनी तो सिद्धांत जन्मास घातला त्याची वस्तुनिष्ठ मांडणी

(2) स्थूलमानाने ज्यास कार्यकारण संबंध म्हणता येईल त्याचे विवरण

(3) अमुक एक गोष्ट घडावी किंवा योग्य होईल

असे व स्पष्ट असे मुल्यात्मक प्रतिपादन.

अशाप्रकारे कोणतेही राजकीय सिद्धांत असो त्यामध्ये वस्तुनिष्ठता कार्यकारणसंबंध आणि मुल्य-मापनात्मक प्रतिपादन या गोष्टींचा समावेश असतो. असे सेबाइन यांचे मत आहे.

राजकीय सिद्धांताचे स्वरूप समजावूनघेण्या काळात तत्वज्ञानात्मक ठरते पूर्वीच्याकाळी तथ्ये आणि मुल्ये यात फरक केला जात नाही त्यामुळे राजकीय सिद्धांत आणि राजकीय तत्त्वज्ञान यामध्ये फरक मानला जात नव्हता. ॲरिस्टॉटलने राजकीय सिद्धांत व राजकीय कृती यामध्ये फरक केला आहे. परंतु राजकीय सिद्धांताची मांडणी आपल्या दृष्टिकोनातून केली यामुळे विश्लेषण परिणाम कडे जाण्याची त्याची पद्धत शास्त्रीय नव्हती

याउलट ॲरिस्टॉटलने 158 राज्यघटनांच्या अभ्यास
वरही विचार आजही उपयुक्त व मार्गदर्शक
ठरतात. हॉब्ज आणि मॅकियावेलीने आपले
राजकीय सिद्धांत तत्कालीन परिस्थितीच्या
अभ्यासावरुन मांडले होते. ते त्या
काळातील घटनांचे कार्यकारण संबंध स्पष्टी
त्या दृष्टीने त्यांनी मांडलेले राजकीय
सिद्धांत आजही महत्त्वपूर्ण ठरतात. आधुनिक
काळात राज्यशास्त्रांनी राजकीय घटना व
त्यांचा परस्परसंबंध निश्चित करुन शास्त्रीय
निष्कर्ष काढण्याचा प्रयत्न सुरु केला
त्यामुळे विसाव्या शतकातील राजकीय सिद्धांताला
मूल्यनिरपेक्षतेच्या दृष्टीने महत्त्व प्राप्त झाले.
मूल्यनिरपेक्ष दृष्टीतून आधुनिक राज्यशास्त्रांनी
राजकीय सिद्धांताची मांडणी केली. अवलोकन
निरीक्षण मुलाखती सर्वेक्षण मापन या
पद्धतीच्या अवलंबन करुन आधुनिक काळात

राजकीय सिद्धांत मांडण्यात आले.

वरील सर्व विवेचनाच्या अनुषंगाने राजकीय सिद्धांताचे स्वरूप खालीलप्रमाणे सांगता येईल

① राजकीय सिद्धांत हे अनुभवावर आधारलेले असतात कारण अनुभवाद्वारे प्राप्त होणारे ज्ञान हेच खरे ज्ञान होय.

② राजकीय सिद्धांत मानवी जीवनापुढे निर्माण झालेले प्रश्न सोडविण्याचे कार्य करतात. समाजाच्या राजकीय जीवनाचे तात्कालिक व सामान्य प्रश्न इतरांपेक्षा जवळून पाहतो आणि इतरांपेक्षा त्याचे अधिक सखोल विश्लेषण करतो हे राजकीय सिद्धांताचे कार्य करते. ~~समान~~

③ राजकीय सिद्धांत हे मूल्याधिष्ठित परस्परसंबंध

व तर्कशुद्धरित्या मांडलेले असतात-

(7) राजकीय सिद्धांत हे सद्यपरिस्थितीचा अभ्यास करतात आणि भविष्यकालीन समाजाच्या विकासाच्या विचार करतात.

(8) राजकीय सिद्धांत प्रत्यक्ष प्रश्नांचे निराकरण करीत असतांना अनुभवलेली गोष्ट व्यवस्थितरित्या मांडणे त्याचे विश्लेषण करणे व त्याचे मुल्यमापन करणे ही कार्य असतात.

अशाप्रकारे राजकीय सिद्धांताच्या स्वरूपासंबंधी मुद्दे मांडता येतील. कारण आधुनिक काळातील राजकीय सिद्धांताला राजकीय विश्लेषण असेही म्हटले जाते. राजकीय सिद्धांत हे आदर्शवादी तत्त्वज्ञानात्मक

आणि मूल्याधिष्ठित होते व स्वरूप विसाव्या शतकात बदलले आणि राजकीय सिद्धांताला अनुभववादी मूल्यनिरपेक्षता यांची जोड लाभली त्यामुळे जुन्या राजकीय सिद्धांताचे पुनरुज्जीवन झाले आहे असे डाल म्हणतो.

## राजकीय सिद्धांत ही समाजजीवनाची एक गरज

राजकीय सिद्धांत ही समाजजीवनाची एक गरज आहे कारण राजकीय सिद्धांत ज्या काळात मांडला जातो त्या काळात व्यक्तीच्या जीवनावर त्याचा प्रभाव पडलेला असतो. त्यामुळे मानवी इतिहासात मोठी उलथा-पालथ होते. त्याचे श्रेय राजकीय सिद्धांताला जाते. कारण त्याकाळात सामाजिक

घडामोडी होतात त्याला राजकीय सिद्धांत जबाबदार असतात. हे राजकीय सिद्धांत सामाजिक घडामोडीला वळण देण्यास कारणीभूत असतात समाजातील विशिष्ट परिस्थितीला प्रतिसाद देण्यातून राजकीय सिद्धांत तयार होत असल्यामुळेच त्या काळातील लोकांनी ते समजून आचरणामध्ये आपली आयुष्ये समर्पित करण्याची तयारी असंख्य व्यक्ती करतात म्हणजे याचा अर्थ असा की हे सिद्धांत समाजाच्या गरजेतून उद्भवलेले असतात नव्हे हा केवळ सिद्धांत शब्दच्छल होत असतो.

राजकीय सिद्धांताचा मुलाधार विचारप्रणाली आहे. ती विचारप्रणाली सामाजिक असो अथवा धार्मिक असो विचारामुळे लोक

संघटित होतात आणि त्या परिणाम म्हणून सामाजिक उत्क्रांती किंवा सामाजिक अधोगती होते. राजकीय सिद्धांताची समाजजीवनाला असलेली गरज तंत्रज्ञानाच्या व विज्ञानाच्या प्रगतीमुळे कमी न होता उलट वाढलेली आहे. कारण आधुनिक युगातील माणूस सभोवतालच्या परिस्थितीविषयी अनभिज्ञ राहून जगू शकत नाही त्यामुळे समाजजीवनाचा जसजसा विकास होत गेला तसतसे नवेनवे राजकीय सिद्धांत माणसाने निर्माण केल्याचे दिसते. म्हणून माणसाला जगण्यासाठी विज्ञान कला वगैरेची जेवढी गरज असते. तेवढीच राजकीय सिद्धांताची गरज आहे.

## राजकीय सिद्धांताची व्याख्या

हेन्री मेयो यांनी राजकीय सिद्धांताची

यानंतर पुढील मुद्द्यांच्या आधारे स्पष्ट उपयोग झाले.

① क्रियाप्रणालींचे अध्ययन

प्रत्येक राजकीय क्रियाप्रणालीच्या ही विशिष्ट राजकीय सिद्धांत आणि तत्त्वज्ञान सांगते त्याचबरोबर प्रत्येक राजकीय व्यवस्था ही कोणत्याही राजकीय क्रियाप्रणालीने प्रभावित झालेले असते. यांचा अभ्यास राजकीय सिद्धांताद्वारे केला जातो. उदा. हुकूमशाही लोकशाही सामंतशाही साम्यवाद उदारमतवाद राष्ट्रवाद इत्यादी भारतातील राजकीय व्यवस्था लोकशाही समाजवादी धर्मनिरपेक्ष या क्रियाप्रणाली आधारित आहे. अमेरिकेच्या अध्ययीन लोकशाहीत भांडवलशाही क्रियाप्रणालीच्या प्रभाव

पडलेला आहे. या सर्व गोष्टींचा अभ्यास राजकीय सिद्धांतात केला जातो.

## (२) अभिजात राजकीय वाङ्मयाचे अध्ययन

विविध राजकीय विचारवंतानी आतापर्यंत केलेले अभिजात राजकीय वाङ्मयाचे अध्ययन करणे आवश्यक आहे कारण प्रत्येक राजकीय व्यवस्था म्हणजे गतकालीन इतिहासाचा आणि घडलेल्या घडामोडींचा इतिहास आहे त्यामुळे भूतकाळातील घटना वर्तमानकाळातील परिस्थितीचा अभ्यास करून त्या सिद्धांताच्या आधारे भविष्य कथन करता येते. उदा. प्लेटो ॲरिस्टॉटल मॅकियाव्हेली हॉब्ज, लॉक रुसो, मार्क्स इत्यादी विचारवंतानी जे काही ग्रंथ लिहिले आहेत त्या ग्रंथाचा अभ्यास केला आहे तो अभ्यास योग्य किंवा अयोग्य आहे. याचा विचार

तत्कालीन परिस्थितीच्या संदर्भात करून
वर्तमानकालीन परिस्थितीशी तुलना करून अशा
राजकीय वाङ्मयाचा बोध होण्यास
आपणास राजकीय सिद्धांत मदतनीस ठरतो.

## (३) राजकीय व्यवस्थांचे अध्ययन

राजकीय सिद्धांत प्रमाणे विशिष्ट राजकीय
व्यवस्थेचे समर्थन आणि त्या राजकीय व्यवस्थेचा
अभ्यास केला असता विविध राजकीय
सिद्धांताचे होऊ शकते उदा. साम्यवाद
हा सोव्हिएट रशिया आणि साम्यवादी
चीनच्या राजकीय व्यवस्थेचे समर्थन आणि
स्पष्टीकरण करतो. राजकीय व्यवस्थांच्या
अभ्यासामुळे राजकीय सिद्धांत आणि त्या
राष्ट्रातील प्रत्यक्ष वस्तुस्थिती यांचे आकलन

होते. थोडक्यात एखादा राजकीय सिद्धांत आणि त्याचे त्या देशातील ऐतिहासिक पार्श्वभूमी समजावून घेण्यासाठी राजकीय व्यवस्थेचा अभ्यास व मार्गदर्शक असतो.

(५) <u>अनुभवप्रामाण्य संशोधन</u>

तथ्यसंकलन व विश्लेषण करून संकल्पनांचे संकलन करणे आणि राजकीय सिद्धांत मांडणे हे कार्य राजकीय निष्कर्ष व सिद्धांत मांडले जाते. तथ्यांवर आधारलेले आणि वास्तवावर आधारलेले सिद्धांत होतात यांचे मूल्यमापन संशोधन पद्धतीद्वारे होत असले तरीही संशोधन पद्धतीमध्ये मूल्यव्यवस्थेला अधिक महत्त्व देऊन चालणार नाही तर मूल्यांची चिकित्सा करून त्यांचे व्यवहारातील महत्त्व विशद करावे लागते.